वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांचे कार्यालय, भायखळा पोलीस ठाणे,
हंसराज लेन, भायखळा पुर्व, मुंबई २७, दिनांक :-२५/०८/२०२६.

.....

➢ प्रेसनोट (Pressnote)

दिनांक २३/०८/२०२६ रोजी माझगांवचा मोरया या गणपती मंडळाच्या श्रींच्या आगमन मिरवणुकीमध्ये कोणतीरी अज्ञात व्यक्तीने वरुन अंडी फेकल्याने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करण्याचा प्रकार घडला होता. सदर घटनेबाबत भायखळा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ५२०/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम २९९, १९६ अन्वये तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन लागलीच ५ पोलीस तपास पथके तयार करुन स्थानिक परिसरात व इतरत्र ठिकाणी आरोपीचा शोध घेण्यात आला. तांत्रिक तपास करुन उपलब्ध इतर पुराव्यांच्या आधारे आरोपीची ओळख पटविण्यात आली. सदर प्रकरणात आरोपी दानिश शेर खान, वय २२ वर्षे, यास तपासादरम्यान कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अवघ्या ३६ तासांच्या आत अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपी दानिश हा आँनलाईन आँर्डर घेउन परिसरामध्ये अंडी घरपोच देण्याचा व्यवसाय करतो. नेहमीप्रमाणे त्यादिवशी देखील तो अंडी पोचविण्याकरीता रामभाउ भोगले मार्गावरुन बिल्डींगमध्ये प्रवेश करीत असताना मिरवणुकीदरम्यान वाजवण्यात आलेल्या फटाक्यांच्या धुरामुळे त्याला त्रास झाला होता. त्याचा राग मनात धरुन त्याने हे कृत्य केल्याचे निष्पन्न झाले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करुन त्यास नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, पोलीस सह आयुक्त, (का.व सु.) बृहन्मुंबई श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई श्री विक्रम देशमाने, मा. पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ-१, मुंबई, श्री जयंत मिना, यांचे मार्गदर्शन व सुचनांन्वये स.पो.आ., आग्रीपाडा विभाग, मुंबई, श्री. शशिकांत भोसले, श्री. दिपक सावंत, व.पो.नि, भायखळा पोलीस ठाणे, मुंबई, पोनि श्री किरण खरात, पोनि श्री सचिन शिंदे, पोउनि- श्री सचिन आव्हाड, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी, पोउनि- श्री हनुमान सवासे- गुन्हे प्रकटीकरण अधिकारी, पोउनि- श्री अशोक नरुटे, ए.टी.सी. अधिकारी व पथक यांनी केलेली आहे.

.....